सोमवार २० जानेवारी २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
-अॅड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत    संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 वर्ष : ०२ अंक :१३१ किंमत २ रुपये | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | epaper.lokneta.in

# भरतीसाठी धावणारी मुले एसटीच्या धडकेत चिरडली, बीड येथील भीषण घटनेनंतर महामंडळाचे पत्रक

## मुलांच्या नातेवाईकांना एसटी महामंडळातर्फे प्रत्येकी १० लाखाची मदत मिळणार आहे. तसेच सरकारतर्फे त्यांच्या कुटुंबीयांना जे काय मदत करणे शक्य आहे ती केली जाणार असल्याचे आश्वासन यावेळी परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहे.



बीड -परभणी मार्गावर धावणा-या एसटी बसला घोडका राजुरी येथील स्वराज हॉटेलजवळ झालेल्या भीषण अपघातामध्ये तीन तरुण मुलांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ही घटना अत्यंत वेदनादायक असून मृत्यूमुखी पडलेल्या तरुणांच्या कुटुंबीयांच्या दुःखाम ध्ये आम्ही सहभागी आहोत! दुर्दैवाने अपघातात मृत्युमुखी पडलेल्या तरुणांची आयुष्य आपण परत आणू शकत नाही, परंतु त्यांच्या कुटुंबियांवर कोसळलेला दुःखाचा डोंगर पाहता एसटी म हामंडळाकडून त्यांच्या कुटुंबीयांना दहा लाख रुपयांची मदत देण्याची निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत.बीड-परभणी मार्गावर पहाटे ६ वाजताच्या दरम्यान पोलीस भरतीची तयारी करणा-या तीन तरुण मुलांचा एसटी बसची धडकेत मृत्यू झाला आहे. या प्रकरणात प्रथमदर्शनी केलेल्या तपासात सकाळच्या धुक्यामुळे धावण्याचा सराव करणारी मुले चालकाला दिसली नाहीत, असे चालकाचे म्हणणे आहे. दुर्दैवाने या अपघातामध्ये त्या तीनही मुलांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे बीड आणि परिसरामध्ये शोककळा पसरली आहे. यावेळी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, बीडचे आमदार संदीप क्षीरसागर आणि बीडचे माजी शिवसेना जिल्हाप्रम ुख कुंडलिक खांडे यांच्याशी चर्चा करून मृत्युमुखी पडलेल्या मुलांचा नातेवाईकांना एसटीची दहा लाखांची तातडीची मदत दिली जाणार असल्याचे महामंडळाचे अध्यक्ष आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी म्हटले आहे. एसटी महामंडळाचा निर्णय एसटी महामंडळ दरवर्षी स्वमालकीच्या ५ हजार साध्या लालपरी बसेस खरेदी करणार आहे. यासाठी महामंडळ अंतर्गत पंचवार्षिक नियोजन करण्यात येणार आहे, असा निर्णय काल परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतला आहे . तसेच एसटी महामंडळात यापुढे कुठल्याही पद्धतीने भाडेतत्त्वावर बसेस न घेण्याचा निर्णय परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतला आहे. तिघांचा जागीच मृत्यू मिळालेल्या माहितीनुसार, बीड तालुक्यातील पिंपळनेर पोलीस स्टेशनच्या हद्दीत बीड परळी म हामार्गावर हा अपघात घडला. बीडमधून परभणीत एक एसटी बस जात होती. त्यावेळी बीड -परळी महामार्गावर घोडका राजुरी फाट्याजवळ पाच जण पोलीस भरतीची तयारी करण्यासाठी गेले होते. यावेळी हे तरुण नेहमीप्रमाणे पहाटे व्यायाम करत होते. त्याचवेळी मागून भरधाव वेगात येणा-या एसटी बसने तरुणांना धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की यात तिघांचा जागीच मृत्यू झाला. तर इतर दोघे गंभीर जखमी झाले.

व्यायाम करण्यासाठी गेलेले असताना अपघात बालाजी मोरे, ओम घोडके, आणि विराज घोडके अशी मृत्यू झालेल्या तिघांची नावे आहेत. हे तिघेही नेहमीप्रमाणे सकाळी व्यायाम करण्यासाठी गेले होते. ते बीड परळी महामार्गावर धावत असताना हा अपघात घडला.

सिमेंटच्या रस्त्यावरून बस खाली सरकल्याने हा अपघात झाला असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या घटनेने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

### सिमेंटच्या रस्त्यावरून बस खाली सरकल्याने अपघात?

या घटनेची माहिती मिळताच त्या तरुणांना जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. मात्र त्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. या तरुणांच्या मृत्यूने परिसरात शोककळा पसरली आहे. या घटनेची माहिती कळताच या तरुणांच्या नातेवाईकांनी तात्काळ जिल्हा रुग्णालयात धाव घेतली आहे. सध्या हा अपघात नेमका कशामुळे झाला याचा तपास सुरु आहे. दरम्यान परळी महामार्गावर झालेल्या अपघातात बस सिमेंटच्या रस्त्यावरून खाली घसरल्याने बसचा मागच्या काचा फुटल्या आहेत. या बसमध्ये प्रवासी होते का याबाबतची माहिती अद्याप समोर आलेली नाही. तसेच नेमका कशाने अपघात झाला? याचा तपास पोलीस करत आहेत.

## दौंड बार असोसिएशन तर्फे मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन



**लोकनेता न्यूज नेटवर्क दौंड (बबनराव धायतोंडे)**

**:- दौंड न्यायालयातील बाररूम मध्ये न्यायाधीश, वकील आणि संपूर्ण कर्मचारी यांच्यासाठी दौंड तालुका ॲड्व्होकेट बार असोसिएशन तर्फे मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे दि.(१७) रोजी आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी १३१ लोकांनी या आरोग्य सेवेचा लाभ घेतल्याचे दौंड तालुका अँडव्होकेट बार असोसिएशन चे अध्यक्ष अँड.प्रशांत गिरमकर यांनी सांगितले. या शिबिरासाठी डॉ. तेजस कदम व त्यांच्या सहका-यांनी विशेष सहकार्य केले.तसेच यावेळी मा.न्यायाधीश काळदाते, पाटील, बडगुजर,मुक्कमवार, मोर तसेच अँड. प्रशांत गिरमकर,अँड संदिप येडे, अँड अजित दोरगे, व समस्त वकील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

## माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांची सदिच्छा भेट.

### भेटीदरम्यान हिमायतनगर तालुक्यातील गोल्ला-गोल्लेवार यादव समाजासाठी सभागृह जागा उपलब्ध करून देण्याची मागणी...



लोकनेता न्युज नेटवर्क


नांदेडें बाजीराव गायकवाड

हिमायतनगर गोल्ला गोलेवार यादव म हासंघाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष भुमन्ना आक्केमवाड भोसीकर यांचे नेतृत्वाखाली गोल्ला गोलेवार यादव समाज शिष्टमंडळाने व माजी मुख्यमंत्री तथा खासदार सन्माननीय श्री अशोकरावजी चव्हाण साहेब यांची नांदेड येथे निवासस्थानी हिमायतनगर तालुक्यातील समाजातील पदाधिका=यांनी सदिच्छा भेट घेऊन भगवान श्रीकृष्ण व यादव समाजासाठी सभागृह साठी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

यावेळी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष भुमन्नाजी आक्केमवाड साहेब, प्रदेश उपाध्यक्ष पी. पी.फाजेवाड, जेष्ठ मार्गदर्शक पी.जी.रुद्रवाड सर,जिल्हा उपाध्यक्ष रमेश रामपुलवार, जिल्हा सचिव अशोक कासळालीकर, बालाजी शैनेवाड सर, तुकाराम कैलवाड, नारायण वटपलवाड, हिमायतनगर तालुका तालुका उपाध्यक्ष श्याम जक्कलवाड, हिम ायतनगर ओबीसी तालुका अध्यक्ष बाबाराव जरगेवाड, ता.कार्यध्यक्ष नारायण कोरेवाड, उपस्थित होते.अभिषेक बकेवाड म्हणाले की आता समाज एकजुट करण्याबरोबरच जागा उपलब्ध करण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्न आम्ही सर्वजण एकत्र मिळून येणा=या काळात गोल्ला-गोल्लेवार यादव समाज महासंघाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष भुमन्ना आकेमवाड यांच्या नेतृत्वाखाली, हिमायतनगर तालुक्यातील पदाधिकारी व समाज बांधवांनी आदरणीय माजी, मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण साहेब यांची भेट घेऊन हिमायतनगर तालुक्यात यादव समाजासाठी सभागृहच्या जागेसाठी मागणी करत संध्या गोल्ला गोलेवार यादव समाजाच्या अस्तित्वासाठी व जागे साठी ॲक्शन मोडवर असल्याचं, राष्ट्रीय यादव महासभेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष तथा नांदेड जिल्हाध्यक्ष युवक अभिषेक बकेवाड सांगितले.

## नवीन नांदेड मराठी पत्रकार संघाच्या

### अध्यक्षपदी तिरूपती पाटील घोगरे,- तर. कार्याध्यक्षपदी रमेश ठाकूर



लोकनेता न्युज नेटवर्क

नांदेड बाजीराव गायकवाड

नवीन नांदेड मराठी पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी तिरूपती पाटील घोगरे तर कार्याध्यक्षपदी रमेश ठाकूर यांची बिनविरोध निवड करण्यात करण्यात आली.

गतवर्षीचे मावळते अध्यक्ष रमेश ठाकूर यांच्या एक वर्षाच्या कालावधी पूर्ण झाल्या नंतर नव्याने कार्यकारिणी निवडीसाठी १९ जानेवारी रोजी हडको येथील दतकृपा मंगल कार्यालय येथे बैठक घेण्यात आली यावेळी नव्याने अध्यक्षपदासाठी अनिल धमणे व तुकाराम सावंत यांनी तिरूपती पाटील घोगरे यांची अध्यक्ष पदासाठी नाव जाहीर केल्यानंतर उपस्थित सर्वांनी संमती दिल्यानंतर उर्वरित कार्यकारणीत कार्याध्यक्षपदी रमेश ठाकूर, उपाध्यक्षपदी शाम जाधव, कोषाध्यक्ष सारंग नेरलकर, सचिव निळकंठ वरळे,तर सल्लागार म्हणून तुकाराम सावंत ,किरण देशम ुख,अनिल पाटील धमणे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी वेगवेगळ्या उपक्रमासह विविध विषयावर चर्चा करण्यात आली.

निवडी नंतर हडको येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले तर निवडीबद्दल नव्याने घोषीत कार्यकारिणीचा सत्कार करण्यात आला.

## स्वामीत्व योजनेच्या मालमत्ता पत्रक वितरण कार्यक्रम संपन्न

लोकनेता न्युज नेटवर्क मालेगाव संदीप कदम

स्वामीत्व योजनेच्या मालमत्ता पत्रक वितरण कार्यक्रम पंचायत समिती अर्धापूर येथे संपन्न .दिनांक १८ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ठीक दहा वाजता पंचायत समिती अर्धापूर येथे मा.गट विकास अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली,स्वामी योजनेचे मालमत्ता पत्रक वितरणा बाबत तालुक्यातील माननीय सरपंच , उपसरपंच,ग्रामपंचायत अधिकारी ,रोजगार सेवक, आपले सेवा सरकार केंद्र चालक ,व मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी या कार्यशाळेला उपस्थित होते. या कार्यशाळेचा भूमी अभिलेख अर्धापूर चे लक्ष्मण



सरोदे यांनी सविस्तर स्वामीत्व योजनाचे फायदे व स्वामित योजना विषयी मार्गदर्शन केले तसेच श्री मुंडकर विस्तार अधिकारी पंचायत यांनी कार्यशाळेला सविस्तर मार्गदर्शन केले या कार्यशाळेत त स्वच्छता विषयक शपथ, नशा मुक्त शपथ घेण्यात आली आहे दुपारी १२:३० वा या देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी साहेब यांचे ऑनलाईन थेट प्रक्षेपण दाखविण्यात आले आहे.या कार्यशाळेचे सुतारे राजेश,विजय निकम क.सा. यानी नियोजन चांगल्या प्रकारे केली आहे तसेच सूत्रसंचालन शिवकुमार देशमुख ग्रामपंचायत अधिकारी यांनी केले आहे .स्वामीत्व योजनेच्या मालमत्ता पत्रक वितरण कार्यक्रम संपन्न झाला.

## बीडमधील गुंडाराज कमी होईना...!!

# संतोष देशमुख प्रकरण ताजे असतानाच आज बीड जिल्हा पुन्हा दोन प्रकरणांनी गाजला..!

## संतोष देशमुख प्रकरण ताजे असतानाच आज बीड जिल्हा पुन्हा दोन प्रकरणांनी गाजला..!

लोकनेता न्युज नेटवर्क आष्टी (अण्णासाहेब साबळे)

विशेष वृत्त :आष्टी तालुक्यात वहिरा गावात नातेवाईकांतील जुन्या वादातून दोन सख्ख्या भावांना ठार मारण्यात आले. तर दुस-या घटनेत आंबेजोगाई येथे एका तरुणावर गोळीबार करण्यात आला.बहिणीचे लग्न आपल्याशी लावून देत नसल्याने हा गोळीबार करण्यात आल्याचे सांगण्यात आले. बीड जिल्ह्याच्या आष्टी तालुक्यात गुरूवारी वाहिरा येथे रात्री दहाच्या दरम्यान तीन सख्खा भावांवर त्याच्याच समाजातील काही लोकांना लोखंडी रॉड,धारदार शस्त्राने हल्ला केला,या हल्ल्यात दोन सख्खा भावांचा जागीच मृत्यू झाला. तर अन्य एक भाऊ गंभीर जखमी झाल्याची घटना अंभोरा पोलिस ठाणे हद्दीत घडली.अजय विलास भोसले,भरत विलास भोसले असे मयताचे नावे असून कृष्णा विलास भोसले हा गंभीर जखमी आहे.या डबल मर्डर च्या घटनेने पुन्हा एकदा बीड जिल्हा हादरला आहे ज्या ठिकाणी ही घटना घडली आहे.

### गुन्हा दाखल होण्यापुर्वीच दुहेरी हत्याकांडातील आठ आरोपींना घेतले ताब्यात

अंभोरा पोलीसांनी ताब्यात.पोलीस स्टेशन अंभोरा हद्यीत दि. १६.१०.२०२५ रोजी रात्री १०.०० वा चे सुमारास मौजे वाहिरा येथे हात्तोळण व वाहिरा येथील पारधी समाजातील लोकांमध्ये आपआपसात भांडण होवुन दोन व्यक्ती जागीच मयत झाले बाबतची माहिती सपोनि श्री.मंगेश साळवे प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन अंभोरा यांना मिळाल्याने सपोनि श्री.मंगेश साळवे साहेब यांनी सदरची माहिती मा. पोलीस अधिक्षक श्री नवनीत काँवत साहेब,मा.अपर



पोलीस अधिक्षक श्री. सचिन पांडकर साहेब,उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.बाळकृष्ण हनपुडे पाटील

### दुहेरी हत्याकांडातील गुन्हयातील आठ आरोपींना ताब्यात घेण्यात आले

घटनेचे गांभीर्य लक्षात घेवुन सपोनि मंगेश साळवे साहेब यांनी अंभोरा पोस्टेचे दोन पथके तयार करून तात्काळ परिसरातुन गोपनीय माहिती घेवुन आरोपींचा शोध घेणे कामी रवाना केले असता गुन्हयातील आठ आरोपींना ताब्यात घेण्यात आले असुन गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

(सपोनि मंगेश साळवे)

साहेब यांना देवुन त्यांचे मार्गदर्शनाखाली सोबत पोउपनि चंद्रकांत तावरे,पोलीस हवालदार बाबासाहेब गर्ने,मनोजकुमार



खंडागळे,बाबुराव तांदळे,भरत माने, दत्तात्रय टकले, लुईस पवार,पोलीस अंमलदार-शिवदास केदार,सुदाम पोकळे,

**मयत झालेल्या दोन भावा ची आई**

### सख्या भावांना मारले

आष्टी तालुक्यातील वहिरा गावात दोन गटांत तुबळ राडा झाला. आदिवासी समाजातील नातेवाईकात जुन्या कारणांतून झालेल्या वादांत सख्ख्या तीन भावांवर हल्ला झाला. त्यात धारदार शस्वाने वार केल्याने दोन भाऊ जागीच ठार झाले तर तिस-या भाऊ गंभीर जखमी झाला. जखमी कृष्णा भोसले याच्यावर अहिल्यानगर शहरातील रुग्णालयात उपचार सुरु आहेत.या घटनेत अजय भोसले व भरत भोसले हे दोघे जागीच ठार झाले.या प्रकरणी आष्टी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.



अमोल सिरसाट, सतिष पैठणे यांचे दोन पथक तयार करुन तात्काळ घटनास्थळी भेट दिली असता दोन ईसम रक्तबंबाळ अवस्थेत पडलेले होते.तसेच एक इसम गंभीर जखमी असल्याने त्यास अहिल्यानगर येथे उपचार कामी पाठविले आलेले आहे. सदर घटनेतील मयत झालेल्या दोन भावा ची आत्य हल्यातील जखमी

### अंबाजोगाईत गोळीबार - आरोपीला पोलिसांनी शिताफीने केले जेरबंद

दुस-्या घटनेत पुण्यात सॉफ्टवेअर इंजिनिअर असलेल्या तरुणीच्या भावावर गोळीबार करण्यात आला. या घटनेत या तरुणीचा भाऊ थोडक्यात बचावला.आपल्या बहिणीचे लग्न म



ाझ्याशी लावून देत नसल्याच्या करणातून आरोपी गणेश चव्हाण याने हे कृत्य केल्याचे सांगितले जात आहे.गोळीबार केल्यानंतर गणेश चव्हाण हा पळून गेला होता.पोलिसांच्या दोन पथकाकडून त्याचा शोध सुरु होता. अखेर लातूर जिल्ह्यातील रेणापूर येथील गोविंदनगर भागात लपून बसलेल्या आरोपीला पोलिसांनी शिताफीने जेरबंद केले. मयताचे नावे १) अजिनाथ विलास भोसले २) भरत विलास भोसले असे असून गंभीर जखमी असलेल्या इसमाचे नाव कृष्णा विलास भोसले रा.हातोळण ता.आष्टी जि.बीड असे आहेत. तसेच घटनास्थळी गेल्यानंतर मयत जखमींचे नातेवाईकांकडे विचारपुस केली असता सदरची घटना हि जुन्या वादाचे कारणावरून झाल्याचे समजले.तसेच यातील मयत इसम व जखमी इसम व आरोपी यांची गुन्हेगारी पार्श्वभुमी असुन त्यांचेवर जबरी चोरी,दरोडे असे गुन्हे दाखल असल्याची माहिती मिळाली.

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
दैनिक लोकनेता
सोमवार २० जानेवारी २०२५
epaper.lokneta.in


# संपादकीय

## खराब कोलेस्ट्रॉल नियंत्रित करण्यास मदत करतील ही स्वस्त फळे

खराब कोलेस्ट्रॉलला कोलो-डेन्सिटी लिपोप्रोटीन ( एलडीएल ) देखील म्हणतात. तुमच्या शरीरात एक प्रकारचे कोलेस्टेरॉल असते, जे रक्तवाहिन्यांमध्ये जमा होऊ शकते. त्यामुळे रक्तवाहिन्या ब्लॉक होऊन हृदयविकार वाढण्याचा धोका सर्वाधिक निर्माण होतो. खराब कोलेस्ट्रॉल यकृतात तयार होते आणि नंतर रक्तात विरघळण्यासाठी लिपोप्रोटीनशी बांधले जाते. न्यूट्रिशनिस्ट नमामि अग्रवाल सांगतात की, जर शरीरात बॅड कोलेस्ट्रॉलची पातळी वाढली तर ते रक्तवाहिन्यांमध्ये जमा होऊन प्लेग तयार करते, ज्याला एथेरोस्क्लेरोसिस म्हणतात. हे प्लेग रक्त प्रवाह कमी करू शकते, ज्यामुळे हार्ट स्ट्रोक आणि हृदयविकाराचा झटका येऊ शकतो. शरीरातील वाढलेले कोलेस्टेरॉल कमी करण्यासाठी काही स्वस्त फळांचा आहारात समावेश करता येऊ शकतो, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. यासाठी तुम्ही देखील तुमच्या आहारात या फळांचा समावेश करा आणि तुमच्या हृदयाचे आरोग्य चांगले ठेवा. सफरचंदाचे सेवन करा खराब कोलेस्टेरॉल नियंत्रित करण्यासाठी सफरचंद अतिशय प्रभावी फळ आहे. सफरचंदात विरघळणारे फायबर आणि पेक्टिन असते, जे कोलेस्टेरॉलला रक्तातून बाहेर काढण्यास मदत करते. दररोज एक सफरचंद खाल्ल्याने कोलेस्टेरॉलची पातळी योग्य राहते. अननसाचे सेवन करा अननसामध्ये व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात आढळते. अननसामध्ये ब्रोमेलेन नावाचे एंजाइम असते. यामुळे नसांमध्ये अडकलेले खराब कोलेस्टेरॉल बाहेर काढण्यास मदत होते. यासोबतच शरीराच्या आतील भागाचीही स्वच्छता करते. ज्यामुळे तुमच्या हृदयाचे आरोग्य चांगले राहते. संत्रे आणि लिंबू सेवन करा कोलेस्टेरॉल कमी करण्यासाठी व्हिटॅमिन सी खूप फायदेशीर मानले जाते. त्यामुळे संत्रा, लिंबू, आणि हंगामी फळांचा आहारात समावेश अवश्य करावा. दररोज एक संत्री किंवा हंगामी फळे खाल्ल्याने कोलेस्टेरॉल नियंत्रणात राहते. द्राक्षाचे सेवन करा द्राक्षांमध्ये अँटीऑक्सिडंट्स आणि फायबर असतात, जे कोलेस्टेरॉल कमी करण्यास मदत करतात. यात रेझवेराट्रॉल नावाचा घटक असतो, जो हृदयाच्या आरोग्यासाठी चांगला असतो. नियमित द्राक्षे खाल्ल्याने कोलेस्टेरॉल नियंत्रणात राहते. खराब कोलेस्ट्रॉल नियंत्रणात ठेवण्यासाठी तुमच्या आहारात हेल्दी डाएटचा समावेश करा. बाहेर तळलेले आणि मसालेदार पदार्थांपासून दूर राहा. यासोबतच दररोज व्यायाम करा. ( डिस्क्लेमर : या आर्टिकलमध्ये देण्यात आलेली माहिती व उपाय हे सामान्य ज्ञानावर आधारित आहेत. आमचा याला दुजोरा नाही. ते अवलंबण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला जरूर घ्यावा.)



# मला ठरवून टार्गेट केले जात आहे, पण मी अभिमन्यु नाही, मी अर्जुन आहे - धनंजय मुंडे

### स्व.संतोष देशमुख यांच्या मारेक-यांना फासावर लटकवा - मुंडेंची राष्ट्रवादी नव संकल्प शिबिरातून मागणी

### बीड म्हणजे बिहार आणि परळी म्हणजे तालिबान, अशी भयानक खोटी प्रतिमा तयार केली जात आहे ?

### आम्ही ऊसतोड कामगार, वैद्यनाथांच्या परळीला आणि बीड जिल्ह्याला बदनाम करु नका - मुंडेंची कळकळीची विनंती

### कार्यकर्त्याला ताकत देताना विश्वास महत्त्वाचा, तरच संघटन मजबूत होईल – धनंजय मुंडेंचे शिर्डीत आक्रमक भाषण

### पहाटेच्या शपथविधी पासून बीड जिल्ह्यातील सामाजिक सलोख्याबाबत धनुभाऊंनी मनमोकळा संवाद साधला

शिर्डी (प्रतिनिधी) - मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यापासून अजितदादांच्या प्रत्येक निर्णयात ठामपणे सोबत उभा राहिलो. पक्षाच्या वाईट काळात वेगवेगळी आंदोलने, यात्रा आदींच्या माध्यमातून अख्खा महाराष्ट्र पिंजून काढला. मात्र आता बीड जिल्ह्यातील एका दुर्दैवी हत्या प्रकरणा आडून मला जाणीवपूर्वक ठरवून टार्गेट केले जात आहे. महायुतीतील नेत्यांकडूनच मला लक्ष्य केले जात आहे, याचेच जास्त वाईट वाटत आहे. पक्षातील काही लोक देखील दादांच्या कानाला लागून चुकीची माहिती देऊन दिशाभूल करत आहेत. मात्र तरीही माझी भूमिका व वस्तुस्थितीची जाणीव असल्याने या कठीण काळातही पक्ष म्हणून दादा माझ्या पाठीशी उभे आहेत. आज कुणी निराधार व बिनबुडाचे कितीही आरोप करून मला अडकवण्याचा, माझा अभिमन्यु करण्याचा प्रयत्न केला तरीही उपयोग होणार नाही, कारण मी अभिमन्यु नाही, मी अर्जुन आहे! अजित दादांनी आता बीड जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारले आहे, याचा आनंदच असल्याचे मत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते, राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले आहे. शिर्डी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आयोजित नव संकल्प शिबिराच्या व्यासपीठावरून ते बोलत होते. बीड जिल्ह्यात डिसेंबर महिन्यात झालेली स्व.संतोष देशमुख यांची हत्या ही अत्यंत दुर्दैवी आणि संतापजनक होती. संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फासावरच लटकवले पाहिजे, हे माझे पहिल्या दिवसापासून स्पष्ट मत आहे. गुन्हेगारी ही एक नीच वृत्ती आहे, त्याला जात धर्म नसतो. मात्र या घटनेच्या आडून जात म्हणून एका



समाजाला जाणीवपूर्वक गुन्हेगार ठरवले जात आहे. सातत्याने आमची मीडिया ट्रायल केली जात आहे, याबद्दल धनंजय मुंडे यांनी खंत व्यक्त केली . तुमच्या अंगावर कोणी आले तर त्याला आम्ही शिंगावर घेतले पक्षात आल्यापासून आजवरच्या वाटचालीत आमचे नेते म्हणून आम्ही तुमच्या पाठीशी उभे राहिलो. अनेक प्रसंगी अजितदादांना खलनायक ठरवण्याचा प्रयत्न झाला. तुमच्या अंगावर कोणी आले तर त्याला आम्ही शिंगावर घेतले. २०१४ - १९ या काळात विरोधी पक्षनेतेपदी काम केले. पक्षाच्या पडत्या काळात चार वेळा हल्लाबोल, परिवर्तन, शिवस्वराज्य यात्रांमध्ये सहभागी होऊन सबंध महाराष्ट्र पिंजून काढला. तत्कालीन सरकारला वाकवायचे काम केले. २०१९ साली पहाटेची शपथ घेऊ नका हे मी सांगितले होते. ती शपथ त्यांनी घेतली पण शिक्षा मात्र मला मिळाली, अशी खंतही धनंजय मुंडे यांनी आज प्रथमच बोलून दाखवली. सामाजिक न्याय मंत्री म्हणून मी चांगले काम करून दाखवले. गाव - वस्त्यांची जाती वाचक नावे बदलणे, ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ यांसारखे अनेक क्रांतिकारी निर्णय त्याकाळात घेतले. ११ हजार कोटी रुपये पीकविमा एका वर्षात मिळवून देणारा कृषिमंत्री मी, मात्र त्यावरूनही टीका झाली. मात्र अर्धवट माहिती देऊन बदनामी करणारे लोक यावर बोलत नाहीत, असेही धनंजय मुंडे यांनी स्पष्ट केले. खरे दुखणे लोकसभा निवडणुकीमध्ये अनेक ठिकाणी युतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी मी गेलो होतो. त्यावेळी बारामती लोकसभा निवडणुकीत सुनेत्रा वहिनींच्या प्रचारासाठी जाऊ नकोस अन्यथा पुढे विधानसभेत त्याचा तुला त्रास होईल, असा सल्ला मला अनेकांनी दिला होता. मात्र तरीही मी गेलो. माझ्यासह अनेकांना विधानसभा निवडणुकीत ठरवून टार्गेट केले गेले. मी माझ्या परळीच्या जनतेच्या आशीर्वादाने एक लाख चाळीस हजार मतांच्या लिडने निवडून आलो, त्याचीच पोटदुखी अनेकांना प्रकर्षाने झाली. ठाण्यात मी पक्षाच्या उमेदवाराच्या प्रचाराला गेलो म्हणून तिथले नेते बीडमध्ये येऊन मला टार्गेट करत आहे, हेही उघड झाले. विधानसभा निवडणुकीत मी केवळ ५ दिवस पूर्णवेळ परळीत होतो, उर्वरित वेळेत मी पक्षाच्या अनेक उमेदवारांच्या प्रचारासाठी सभा घेतल्या, बैठका घेतल्या. त्यातील बहुतांश उमेदवार निवडून आले, असेही मुंडे पुढे बोलताना म्हणाले. मी काम करणारा कार्यकर्ता मी सतत काम करणारा एक कार्यकर्ता आहे, नेता फक्त नावाला आहे. माझ्यातला कार्यकर्ता कधीच मरणार नाही. मी एक निष्ठावान कार्यकर्ता आहे, पक्ष नेतृत्वाने पाँडिचेरी मध्ये जाऊन पक्ष विस्ताराचे काम कर म्हंटले तर तिथे जाऊन मी काम करेल. पक्षाला सुद्धा कार्यकर्ताभिमुख व्हावे लागेल. कार्यकर्त्याला ताकत देताना संपूर्ण विश्वास देखील ठेवणे आवश्यक आहे, तेव्हाच पक्ष संघटना मजबूत होईल. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये पक्षाचा कार्यकर्ता कुठेही कमी पडणार नाही, असा विश्वास धनंजय मुंडे यांनी व्यक्त केला. बीड जिल्हा अन् सामाजिक सलोखा स्व.संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकारनानंतर झालेल्या मीडिया ट्रायल, सोशल मीडियावरील चिखलफेक, साधलेले राजकारण अशा अनेक गोष्टींनी जिल्ह्याचे सामाजिक ऐक्य धोक्यात आले आहे. आपला पक्ष शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांवर चालणारा पक्ष आहे, त्यामुळे आता आमच्या बीड जिल्ह्यातील सामाजिक सलोखा जपण्याची जबाबदारी सुद्धा सर्वांना घ्यावी लागेल. ऊसतोड करून, कष्ट करून, कोरडवाहू शेती करून जगणारे आम्ही सामान्य लोक आहोत. आमचा जिल्हा बिहार आणि आमची परळी तालिबान नाही. अशीच बदनामी सुरू राहिली तर पुढच्या महिन्यात महाशिवरात्री आहे, बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू वैद्यनाथ यांच्या दर्शनाला भाविक येतील का, अशी भीती वाटत असल्याचे सांगून परळीची बदनामी थांबवा असे कळकळीचे आवाहन त्यांनी केले.

# रात्री शांत झोप येत नाही का?

आज-काल धावपळीच्या युगात रात्री शांत झोप न येणे ही एक कॉमन समस्या झालेली आहे का? रात्री शांत झोप येणे ही सर्व वयोगटातील समस्या आहे का? ज्या व्यक्तीला रात्र रात्र झोप येत नाही झोप येण्यासाठी तो तडफडत असतो झोप येत नाही. म्हणून कासावीस होऊन अस्वस्थ होत असतो. अनिद्रांचे परिणाम व्यक्तीच्या शरीर मनावर पडत असतात. याला झोपेचे महत्त्व काय आहे हे समजत असते. रोज व्यक्तीला सहा ते आठ तासाची झोप घेणे आवश्यक असते हे आपल्याला माहीतच आहे परंतु दिवसभराच्या कामाच्या दगदगीनंतर अनेकांना रात्री लवकर झोप येत नाही रात्री व्यवस्थित झोप आली नाही तर दिवसभर फ्रेश वाटत नाही. मग शांत झोप न झाल्यावर थकवा येतो कोणत्याही कामात उत्साह जाणवत नाही असे आपल्या सोबत होत आहे का? मग झोप कोणात्या व्यक्तीला येत नाही ज्या व्यक्तीला धोका,काळजी, भीती, त्रास, इर्शा,द्वेष, दुःख, टेन्शन, भावनिकता, एकटेपणा आणि अस्वस्थ मानसिकतेत जीवन जगत असतात त्यांना झोप येत नाही का? मग शांत झोप येत नाही म्हणून खाली काही कामे करतो का? १.अनेक चुकीच्या कृती पुन्हा पुन्हा केल्या जातात का? २. झोप येत नाही म्हणून मोबाईलवर टाईमपास केला जातो का? ३. मोबाईलवर टाईमपास होतो म्हणून पुन्हा झोप मोड होते का? ४. झोप येत नाही तेव्हा जास्तच नकारात्मक वेदनादायी व अस्वस्थ , बेचैन करणारे त्याचबरोबर आत्महत्या सारखे विचार जास्त येतात का? ५.झोप न झाल्यामुळे आपल्या शारीरिक आणि मानसिकतेवर क्षमतेवर,आरोग्यावर, भविष्यातील योजनेवर, कामाच्या दर्जावर परिणाम पडतो का? ६.झोप न झाल्यामुळे शारीरिक व मानसिक थकवा अधिक जाणवतो का? ७. रात्री कौटुंबिक विसंवाद चिडचिड झाल्यास अति भीती काळजी, टेन्शन, दुःख ,त्रास ,चिडचिड, एकटेपणा, असुरक्षितता ,प्रेमाचा अभाव अशा भावना झोपण्यापूर्वी सतत मनात निर्माण होत असतील तर झोप व्यवस्थित होईल का? ८. नकारात्मक विचार अपेक्षा व भावना यांची घुसमट होत आहे का? याचा परिणाम आपल्या झोपेवर पडतो का? ९. भूतकाळात नको असलेल्या घटना पुन्हा पुन्हा डोळ्यासमोर येतात का यामुळे झोप शांत होत नाही का? १०.भूतकाळात जे झाले ते पुन्हा येऊ शकत नाही हे माहीत असून सुद्धा ते विसरत नाही का? निसर्गचक्रानुसार अंधार पडला की तीन तासात गरजे इतका झोपेचा हार्मोन्स स्त्रावत असतो त्यामुळे झोप येत असते. विचार, आहार,व्यायाम आणि झोप प्रत्येक व्यक्तीला खूप गरजेची आहे. या सिक्वेन्स मध्ये कमी जास्त प्रमाणामध्ये बदल झाला की मेंदूमध्ये काही संप्रेरक कमी जास्त प्रमाणामध्ये स्त्रावतात त्यामुळे नको असलेल्या घटना समस्या आपल्याला उद्भवत असतात. मग तुमच्या जीवनामध्ये सुद्धा असं काही होत असेल तर खालील दिलेल्या नंबर वर कॉल करा वेळेवर त्याचे निराकरण केलं नाही तर निद्रानाश व बरच काही होऊन आपल्याला मानसिक गंभीर आजार होऊ शकतात आणि शारीरिक आजाराला तोंड फुटते म्हणून आपण वेळीच यावर उपाय केला पाहिजे.

# बालविवाह: समाजासाठी एक गंभीर समस्या डॉ. सुवर्णा कराड

लोकनेता न्युज नेटवर्क

भारतासारख्या विकसनशील देशात बालविवाह ही एक अतिशय गंभीर आणि समृद्धीला अडथळा आणणारी समस्या आहे. बालविवाह म्हणजे काय? एका अल्पवयीन मुलीचा किंवा मुलाचा विवाह करणे, ज्यामध्ये तो/ती विवाह करण्याच्या वयापेक्षा कमी असतात. त्यातही मुलींच्या बाबतीत या समस्या अधिक गंभीर असतात. त्यामुळे बालविवाहाचे परिणाम केवळ त्या मुलीवर नाही, तर संपूर्ण समाजावर पडतात. बालविवाह होण्याचे अनेक सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक कारणे आहेत, आणि त्याचे परिणाम काय होतात, हे देखील महत्त्वाचे आहे.



### बालविवाहाचे कारणे

बालविवाह होण्याचे कारण अनेक आहेत. मुख्य कारण म्हणजे मुलींच्या शिक्षणाच्या बाबतीत असलेली कमतरता आणि त्यांचे भविष्य असुरक्षित मानले जात आहे. काही कुटुंबांमध्ये, मुलींचे शालेय शिक्षण केवळ ङ्गसमाजाच्या आणि घराच्याङ्ग पद्धतीने विचारले जाते, आणि त्यांचा विवाह हे त्यांच्या कुटुंबासाठी एक ब्रुद्धी म्हणून पाहिले जाते. गरीब कुटुंबे मुलींचा विवाह लवकर लावून त्यांचे पालनपोषण आणि जबाबदारी कमी करतात. त्याचप्रमाणे, काही परंपरांमध्ये असे मानले जाते की मुलींच्या विवाहामुळे त्यांचा चारित्र्य जपला जातो आणि त्या वयात विवाह केल्यास त्या सुरक्षित राहतील.

### बालविवाहाचे परिणाम

बालविवाहामुळे अनेक समस्या उद्भवतात. पहिले, त्या मुलींच्या शिक्षणाच्या संधी कमी होतात. विवाहानंतर त्या मुलीला शाळेत जाण्याचा वेळ मिळत नाही. त्यांची शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्यही बाधित होतात. लहान वयात गर्भवती होणे किंवा मातेसमोरील धोके त्यांना जास्त असतात. यामुळे त्या मुलीला शारीरिक, मानसिक आणि भावनिक ताणतणावांचा सामना करावा लागतो. आर्थिक दृष्टीनेही बालविवाहाचे परिणाम खूप मोठे असतात. ज्या मुली लहान वयात विवाह करतात, त्या शाळेत जाऊन काम न करता त्यांना घरकाम, मुलांची देखभाल आणि घरातील इतर जबाबदा-या पार पाडाव्या लागतात. यामुळे त्या महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होण्यासाठी संघर्ष करावा लागतो. एका मुलीला तिचे भविष्य आणि करिअर सुरु करण्यासाठी एक विस्तारित वेळ लागतो. यामुळे तिच्या आयुष्यात सुसंगत आणि सर्वांगीण विकास होऊ शकत नाही.

### सामाजिक आणि कायदेशीर परिणाम

भारतातील कायद्यांनुसार, मुलींच्या विवाहाचे वय १८ वर्षांवर असावे. मुलांच्या विवाहाचे वय २१ वर्षांवर असावे. तरीही, अनेक कुटुंबे कायद्याची तत्त्वे पाळत नाहीत, आणि मुलींचे विवाह कमी वयात लावले जातात. यामुळे त्या मुलीला विविध कायदेशीर समस्या निमर्ाण होतात. मुलीला तिच्या अधिकारांचे भान नसते, आणि तिच्या इच्छेचा आदर केला जात नाही. त्यानंतर, त्या मुलीला काही अधिकारांची वंचना होते आणि ती समाजातील आपत्तीग्रस्त स्थितीत येते.

### महाराष्ट्रातील बालविवाहांची आकडेवारी

महाराष्ट्रातील बालविवाहांची आकडेवारी चिंताजनक आहे. २०११ च्या जनगणनेनुसार, राज्यात १८ वर्षांखालील मुलींच्या बालविवाहाचे प्रमाण १३.३% होते. ग्रामीण आणि आदिवासी भागात हा दर जास्त आहे, आणि अनेक मुली १६ ते १८ वर्षांच्या वयात विवाह बंधनात अडकतात. आर्थिक, शैक्षणिक कमी आणि पारंपारिक मानसिकता यामुळे बालविवाहांच्या घटनांची संख्या वाढते. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (छऋक्षड) ५ (२०१९-२१) रिपोर्टनुसार, १५-१९ वयाच्या गटात ७.४% मुलींचा विवाह १८ व्या वर्षाच्या आत झाला आहे. महाराष्ट्र सरकारने मबालविवाह प्रतिबंधक कायदाफ लागू केला आहे, पण अंमलबजावणीमध्ये अडचणी असल्याने बालविवाह कमी होण्यास आव्हान राहते.

### बालविवाहावर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाय

बालविवाहाच्या समस्येला प्रभावीपणे तोंड देण्यासाठी, सर्वप्रथम समाजातील जनजागृती गरजेची आहे. मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व सांगून त्यांना अधिकाधिक शालेय शिक्षण देण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे, कुटुंब आणि समाजाचे मानसिकता बदलवणे महत्त्वाचे आहे. सरकारने बालविवाह रोखण्यासाठी कायद्यांची कठोर अंमलबजावणी केली पाहिजे. २५ मे २०१७ रोजी सरकारने बालविवाहाच्या विरोधात तंत्रज्ञानाचा उपयोग करण्याची घोषणा केली होती. यामध्ये बालविवाहाच्या लहान वयाच्या विवाहांची माहिती ट्रॅक केली जाईल. इतर सरकारांच्या योजनेतील मुलींसाठी आव्हान म्हणून ङ्गबेटी बचाओ, बेटी पढ़ाओङ्ग सारख्या योजनांची अंमलबजावणी ही महत्त्वपूर्ण आहे.

एकूणच, बालविवाह एक मोठा सामाजिक दुष्काळ आहे, ज्याचे परिणाम मुलींच्या जीवनावर आणि समाजावर अनेक पटींमध्ये पडतात. या समस्येवर मात करण्यासाठी संपूर्ण समाजाने एकत्र येणे आवश्यक आहे. शिक्षण, जनजागृती आणि कायदेशीर उपाययोजना यांचा एकत्रित वापर केल्यास बालविवाहाच्या समस्येवर नियंत्रण ठेवता येईल. प्रत्येक मुलीला समान अधिकार, स्वातंत्र्य आणि भविष्याच्या दिशेने एक चांगली दिशा मिळवण्यासाठी त्यांना समान संधी मिळवायला हवी.

**लेखन: डॉ. सुवर्णा कराड**
**प्रदेशाध्यक्ष वंजारी महासंघ**
**महिला आघाडी महाराष्ट्र**

### पंचायत समिती सभागृह आष्टी येथे मिशन जरेवाडी कार्यशाळा

## मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांच्या सूचनेनुसार संपन्न.!



लोकनेता न्युज नेटवर्क आष्टी
(अण्णासाहेब साबळे)

आष्टी येथे पं.स.सभाग्रहात कार्यशाळेचे उद्घाटन शिंदे साहेब सहाय्यक गट विकास अधिकारी,श्री महाजन साहेब अधीक्षक पंचायत समिती आष्टी,सुधाकर यादव गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती आष्टी व केंद्रप्रमुख त्रिंबक दिंडे,जावेद पठाण,लोंढे बाळासाहेब यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

प्रमुख पाहुण्यांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन वरिष्ठ केंद्र प्रमुखाच्या हस्ते करण्यात आले. मिशन जरेवाडी या कार्यशाळेचे सूत्रसंचालन श्री शिंदे बापू विषय साधन व्यक्ती यांनी केले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री निंबाळकर बी यु यांनी केले.मिशन जरेवाडी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माननीय शिंदे साहेब व माननीय महाजन साहेब यांनी सविस्तर असे उपस्थित मुख्याध्यापकांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणामध्ये माननीय सुधाकर यादव गट शिक्षण अधिकारी आष्टी यांनी मिशन जरेवाडी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रमाची सविस्तर अशी रूपरेषा उपस्थित मुख्याध्यापकांना,केंद्रप्रमुखांना व शिक्षकांना सांगितले.सर्व विद्यार्थ्यांना मूलभूत भाषिक कौशल्य व पायाभूत संख्याज्ञान प्राप्त होऊन त्यांना त्यांच्या दैनंदिन जीवनात त्याचा योग्य प्रकारे वापर करता येईल अशी विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक प्रगती झाली पाहिजे.

या कार्यक्रमास एकूण ११० मुख्याध्यापक उपस्थित होते.२० केंद्राचे केंद्रप्रमुख व केंद्रीय मुख्याध्यापक तसेच गटशिक्षण अधिकारी कार्यालयातील श्री भडके आर एस,जुनेद शेख,माने आर आर, बागवान एफ एम,शिरसाट डी डी, मारेवार जी एस साधन व्यक्ती व श्री यादव एम सी,निलेश वलवळे,पानसरे हे सर्वजण उपस्थित होते. कार्यक्रमास उपस्थित सर्वांचे आभार माननीय भडके आर एस यांनी मानले.

## रामदास पाटील सुमठाणकर यांचा राष्ट्रवादीत प्रवेश,



लोकनेता न्यूज नेटवर्क

सेनगाव( महादेव हरण):- भारतीय जनता पार्टीचे लोकसभा प्रचार प्रमुख राहिलेले रामदास पाटील सुमठाणकर यांनी शनिवारी शिर्डी येथे पक्षप्रमुख अजित दादा पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्र वादीमध्ये जाहीर प्रवेश केला राज्य शासनाच्या नगर विकास विभागात सेवेत असलेले राम दास पाटील सुंठणकर यांनी चार वर्षांपूर्वी नगरपालिकेच्या मुख्य अधिकारी पदावरून शासकीय सेवेचा राजीनामा दिला भारतीय जनता पार्टीमध्ये पूर्णवेळ काम करण्यासाठी त्यांनी शासकीय नोकरी सोडली भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश घेतल्यानंतर पक्षाकडून त्यांच्यावर अनेक महत्त्वाच्या जबाबदा-या देण्यात आल्या होत्या प्रमुखांनी लोकसभा प्रवास योजनेचे संयोजक पद त्यांच्याकडे होते या पदावर राहून सुंठणकर यांनी हिंगोली लोकसभा मतदार संघामध्ये प्रत्येक गावी भेटी गाठी देऊन अनेकांच्या सम स्या जाणून घेतल्या परंतु हिंगोली लोकसभेच्या जाग्यावरून त्यांना लावण्यात आल्याने त्यांनी भारतीय जनता पार्टी पक्षातून राजीनामा देऊन हिंगोली विधानसभा अपक्ष लढवण्याचा निर्णय घेतला होता परंतु अपयश आल्याने त्यांनी आणखी जनसंपर्क वाढीवला होता तर शिर्डी येथे पक्षप्रमुख अजित दादा पवार यांच्या उपस्थितीमध्ये त्यांनी जाहीर प्रवेश केला यावेळी मा आ प्रताप पाटील चिखलीकर, मा आ राजू भैया नवघरे, मा बि डी बांगर, यांच्या उपस्थितीमध्ये रामदास पाटील सुमठाणकर यांनी जाहीर प्रवेश केला

## बळरिामपुर येथील दिव्यांगाच्या घरी समाज कल्याण सहाय्यक आयुक्तांनी दिली भेट .दिव्यागाने सहाय्यक आयुक्तांची हुबेहूब रेखाटलेली प्रतिमा दिली भेट

लोकनेता न्युज नेटवर्क नांदेड
बाजीराव गायकवाड

बळीरामपूर येथील रहिवासी असलेल्या सिद्धार्थ जमदाडे यांच्या घरी सहाय्यक समाज कल्याण आयुक्त यांनी भेट देऊन दिव्यांग यांची विचारपूस करून भेट दिली त्यावेळेस सिद्धार्थ जमदाडे दिव्यांग यांनी सहाय्यक आयुक्तांची हुबेहूब प्रतिमा रेखाटून त्यांना भेट दिली .शेषराव जम दाडे यांनी पत्रकार क्षेत्रामध्ये काम करून आपले कुटुंब बळीरामपूर येथे स्थायिक केले त्या ठिकाणी छोटसं घर बांधून कुटुंबाचा उदरनिर्वाह सुरू होता त्यांना तीन आपत्य होते त्यापैकी सिद्धार्थ जम दाडे हा दोन नंबरचा मुलगा होता शिक्षणामध्ये हुशार व बुद्धिवान असलेल्या सिद्धार्थ जमदाडे हा बारावीच्या नंतर शिक्षण घेत असताना आंब्याच्या



झाडावर जाऊन आंबे तोडत असताना अपघात होऊन दोन्ही पायाने अपंग झाला.

बारावीचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी पत्रकारिता शिक्षण घेण्यास सुरुवात केली परंतु नीतीचा खेळ वेगळाच आंबे तोडायला झाडावर गेल्याच्या नंतर झाडावरून पडून दोन्ही पाय निकामी झाले चार दिवसांवर ठरलेले लग्न ही मोडून गेले त्यामुळे दिव्यांग सिद्धार्थ जमदाडे हे कायमचे दिव्यांग झाले. दिव्यांग असल्याचे खचून न जाता दिव्यांगावर मात करत आपल्या कलेचे सादरीकरण त्याने चित्रकला ही अवगत केली अनेक आमदार खासदार जिल्हाधिकारी वरिष्ठ अधिकारी यांच्या प्रतिमा हूबेहूब रेखाटण्याची कला त्यांनी अवगत केली. नुकतेच समाज कल्याण सहाय्यक आयुक्त शिवानंद मिंनगिरे यांची प्रतिमा त्यांनी हुबेहूब रेखाटली. सहाय्यक आयुक्तांनी दिव्यांगाची भेट घेण्यासाठी त्यांच्या घरी जाऊन बळीरामपूर येथे भेट देऊन कुटुंबाची विचारपूस केली त्यावेळी मात्र दिव्यांग बांधव सिद्धार्थ जमदाडे यांची संपूर्ण जीवन गाथा सहाय्यक आयुक्तांनी ऐकून घेतली. चार दिवसांवर आलेले लग्न अपुरे राहिले. पत्रकार होण्याची इच्छाही अपुरीची राहिली. तीन भावांपैकी एक भाऊ कायमचा निघून गेला एक भाऊ मिस्त्री काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवतो. आई म्हातारी रोज मंजुरी करून कुटुंबाला मदत करते अशी दिव्यांग सिद्धार्थ जमदाडे यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. समाज कल्याण सहाय्यक आयुक्त शिवानंद मीनगिरे यांची हुबेहूब प्रतिमा त्यांनी रेखाटून यावेळी त्यांना भेट दिली राज्य शासनामार्फत दिव्यांगासाठी असणा-या विविध योजना सिद्धार्थ जमदाडे पर्यंत पोहोचून त्यांना मदतीचा हात देण्याचे सहाय्यक आयुक्त यांनी आश्वासनही सिद्धार्थ जमदाडेला दिले. यावेळी बेरोजगार दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष तथा पत्रकार राहुल साळवे ज्येष्ठ पत्रकार गंगाधर गच्चे आदींची उपस्थिती होती.

## भानेश्वर विद्यालय येथे शैक्षणिक प्रदर्शन व आनंदनगरी चे आयोजन

लोकनेता न्यूज नेटवर्क
सेनगाव (महादेव हरण):-

सेनगाव येथील भानेश्वर विद्यालय शाळेमध्ये आज शैक्षणिक प्रदर्शन व आनंदनगरीचे आयोजन करण्यात आले असून विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक प्रयोग करून नागरिकांना माहिती दिली व दैनंदिन जीवनाकरिता व्यवहाराचे ज्ञान मिळावे याकरिता आनंद नगरीचे आयोजन करण्यात आले होते या शैक्षणिक प्रदर्शनाला व आनंदनगरीला गट शिक्षण अधिकारी पि,के



गव्हाणे सर, अध्यक्ष ओम कोटकर,केंद्रप्रमुख पायघन सर मुख्याध्यापक प्रदीप बुद्रुक सर यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांसोबत शैक्षणिक प्रदर्शना विषयी माहिती जाणून घेतली यावेळी शाळेतील शिक्षक, विद्यार्थी, मोठ्या संख्येने सहभागी झाली होते



यामध्ये शैक्षणिक प्रयोग विद्यार्थ्यांनी बघून या विषयावर माहिती जाणून घेतली व आनंद नगरीमध्ये मोठ्या प्रमाणात खरेदी केली,

## अकोला येथे स्वरशिरोमणी हावगी पन्नासे यांना राज्यस्तरीय श्री पंचाक्षर सेवारत्न पुरस्कार प्रदान...




लोकनेता न्युज नेटवर्क अकोला

श्री सद्गुरू दमया स्वामी जंगममठ संस्थान संचालित,महातपस्वी श्री ष.ब्र.१०८ सद्गुरु पंचाक्षर शिवाचार्य महाराज यांच्या ११८ व्या जन्मोत्सवानिमित्त जिल्हा परिषद कर्मचारी कल्याण भवन, अकोला येथे श्रीमद् काशी ज्ञानसिंहासनाधीश्वर श्रीश्रीश्री १००८ जगद्गुरू डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी काशी यांच्या उपस्थितीत व दिव्य सानिध्यात ज्ञानतपोरत्न श्री ष.ब्र.१०८ सद्गुरु डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य म हाराज श्रीक्षेत्रमन्मथधाम यांच्या वतीने निवड करून व धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय ,कृषी, संगीत क्षेत्रातील प्रमुख मान्यवरांच्या हस्ते कौठा ता.कंधार जि.नांदेड येथील तथा महाराष्ट्र ,कर्नाटक ,तेलंगणा,गुजरात या राज्यातील सुप्रसिद्ध नामवंत गायक स्वरशिरोमणी श्री हावगी उत्तमराव पन्नासे यांना मराज्यस्तरीय वीरशैव श्री पंचाक्षर सेवारत्न पुरस्कार-२०२५फ हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्काराचे स्वरूप शाल,श्रीफळ,स्मृतिचिन्ह,पुणेरी पगडी, रुद्राक्ष माळ देऊन सन्मान करण्यात आले.यावेळी उपस्थित या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री ष.ब्र.१०८ सद्गुरू डॉ.विरुपाक्ष शिवाचार्य महाराज श्री क्षेत्र मन्मथधाम,बाळापुर, श्री ष.ब्र.१०८ सद्गुरू सोमलींग शिवाचार्य महाराज बिचकुंदा,श्री ष.ब्र.१०८ सद्गुरू सिद्धदयाळ शिवाचार्य महाराज बेटमोगरा,श्री ष.ब्र.१०८ सद्गुरू महादेव शिवाचार्य महाराज वाईकर,श्री ष.ब्र.१०८ सद्गुरू वेदांताचार्य दिगंबर शिवाचार्य महाराज वसमत,श्री.ष.ब्र.१०८ सद्गुरू सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज साखरखेर्डा,श्री.ष.ब्र.१०८ सद्गुरू श्रीकंठ शिवाचार्य महाराज नागणसुर,श्री ष.ब्र.१०८ सद्गुरू निलकंठ शिवाचार्य महाराज महिदर्गी,श्री ष.ब्र.१०८ सद्गुरू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज वडांगळी व प्रमुख मान्यवर परिसरातील सर्व भाविक-भक्त बहुसंख्येने उपस्थित होते...

## मुदखेड येथील खताचा तुटवडा थांबवावा व ज्यादा दराने विकी करणा-या दुकानदारावर कार्यवाही करावी

लोकनेता न्युज नेटवर्क
मुदखेड किशोर मुंगल

मुदखेड तालुका हा ओलीताचा तालुका असुन सदरील भागात मोठ्या प्रमाणात खताची आवश्यकता असुन सध्या गहु, ऊस, भोईमुग करीता मोठया प्रमाणात खताची आवश्यकता आहे. मार्केट मध्ये खताचा साठवुन कमी असल्याचे सांगीतले जात आहे. आणि ज्यादा दराने विकी करण्यात येत आहे. कृत्रिम तुटवडा त्वरीत थांबवुन खत्याच्या बाबतील शेतक-यांना त्वरीत दिलासा दयावा.तसेच आम्ही यापुर्वी मा. कृषी तालुका अधिकारी यांच्याकडे विनंती अर्ज सादर करुन सुध्दा कोणतीही कार्यवाही होताना दिसत नाही आणि खताचा तुटवडा कायम आहे. मुदखेड



तालुक्यातील कृषी केंद्रावर किती साठवनुक आहे याची माहिती घेतली असता कृषी तालुका अधिकारी यांनी आम्हाला कोणताच अहवाल दिला नाही.यामुळे मुदखेड तालुक्यातील कृषी सेवा केंद्रात किती खताचा साठा आहे. त्वरीत माहिती घ्यावी तसेच ज्याचा दराने विकी करणा-या कृषी सेवा चालकावर योग्य ती कार्यवाही करावी अशी मागणी शिवाजी पाटील गाढे चिलपिंपरीकर युवा सेना तालुका प्रमुख यांनी केली आहे .

## बीड रेल्वे स्थानक ला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्या : वीर

जिल्ह्यातील जनतेसाठी अत्यंत महत्त्वाचे असणाऱ्या बीड रेल्वे प्रश्न मार्गी लागला असून येत्या काही दिवसात बीड रेल्वे स्थानकाचे उद्घाटन होणार असून होणाऱ्या उद्घाटनापूर्वीच बीड रेल्वे स्थानक ला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे या मागणीसाठी माजी सैनिक अनुरथ वीर हे जिल्हाधिकारी कार्यालय समोर गेल्या पाच दिवसापासून आमरण उपोषणास बसले आहे. त्यांच्या उपोषणाला जिल्ह्यातील सर्व पक्ष संघटनांनी पाठिंबा दर्शविला असून आता सर्वसामान्य जनतेकडून ही बीड रेल्वे स्थानकाला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचेच नाव देण्यात यावे अशी मागणी होत आहे असे की,बीड रेल्वे चालक या उद्घाटन सोहळा दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजी शासनाने करण्याचे निश्चीत केले आहे तरी मी या अगोदर आमरण उपोषण दिनांक १०/१०/ २०२४ रोजी केलेले आहे. परंतु सदरील रेल्वे स्थानक डॉ.बाबासाहेब आंबेडकर रेल्वे स्थानक बीड असे नाव देण्यासाठी शासनाने व लोक प्रतिनिधीनी मला अश्वासन दिले होते.परंतु आज पर्यंत याबाबद कसलेही पत्र व्यवहार किंवा विश्वसात न घेता उद्घाटन करण्याचे निश्चित केले आहे. परंतु हे शासन स्तरावर अर्जपर्यंत यांनी नाव घोषीत केलेले नाही. तरी येत्या २६ जानेवारी बीड रेल्वे स्थानकाच्या उद्घाटनापूर्वीच बीड रेल्वे स्थानकला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे या मागणीसाठी आज पाचव्या दिवशी ही माजी सैनिक अनुरथ वीर ही आमरण उपोषणावर बसले असून त्यांची प्रकृती खाली दिलेली आहे. २६ जानेवारी पूर्वीचे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे नाव बीड रेल्वे स्थानकाला दिले गेले नाहीत तर आंबेडकर जनता रस्त्यावर उतरणार असल्याचे व उद्घाटन होऊ देणार नसल्याचा तीव्र भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या.तरी जिल्हा प्रशासन कडून उपोषण कर्त्याचे दखल न घेतल्याने आज जिल्ह्यातील सर्व पक्ष संघटनांच्या लोकप्रतिनिधी कडून एक शिष्ट मंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आल

## दिगंबरराव बिंदू महाविद्यालयाच्या रा.से.यो. विशेष शिबीराचा मौजे नारवट येथे समारोप संपन्न

लोकनेता न्युज नेटवर्क
भोकर रमाकांत जोशी

भोकर येथील दिगंबरराव बिंदू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या १२ जानेवारी पासून चालू झालेल्या विशेष वार्षिक शिबीराचा तालुक्यातील मौजे नारवट येथे दि.१८ जानेवारी २०२५ रोजी समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. पंजाब चव्हाण, प्रमुख पाहुणे डॉ. रघुनाथ शेटे, सरपंच श्री. रामदास जोंधळे, उपसरपंच श्री. नागोराव झाडे, तंटा मुक्ती समिती अध्यक्ष श्री. सदाशिव डोखळे, पोलीस पाटील श्री. देविदास काळेवार, सहकारी सोसायटीचे चेअरमन श्री.गजानन कुमरे, सौ. सुमनबाई खूपसे, श्री. नारायण कुमरे आणि श्री.गौतम लोखंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. प्रमुख पाहुणे डॉ. रघुनाथ शेटे यांनी शिबीरार्थींना संबोधित करताना रासेयो स्वयंसेवकांनी गावक-यांच्या साथीने श्रमदानातून केलेली ग्राम स्वच्छता, गावाजवळील ओढ्यावर तयार केलेला



वनराई बंधारा, पशुधन विकास अधिकारी डॉ. सुनील जाधव यांच्या मार्गदर्शनात घेतलेले जनावरांचे लसीकरण शिबीर, वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रताप चव्हाण यांच्या मार्गदर्शनात घेतलेले आरोग्य व रक्त तपासणी शिबीर, गावातील जिल्हा परिषद शाळेला ग्रंथ भेट, वृक्षारोपण, रक्तदान, आणि डिजिटल साक्षरता विषयी जनजागृती अशा विविध उपक्रमांचा आढावा घेत अशा प्रकारच्या शिबीरांमधून युवकांचे मन, मस्तिष्क आणि मनगट बळकट होते असे प्रतिपादन केले. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.पंजाब चव्हाण यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक समायोजन इत्यादी मूल्ये रुजविण्याचे रासेयो शिबीर एक व्यासपीठ आहे असे अधोरेखित केले. सरपंच श्री. रामदास जोंधळे यांनी आपल्या मनोगतात स्वयंसेवकांनी आपल्या गावात चालू असलेल्या सुंदर गावाच्या कामात नवी ऊर्जा भरल्याची भावना व्यक्त केली. याबरोबरच जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक व्ही. एस. पांचाळ, आणि माधवराव लोखंडे, नारायण कुमरे, गौतम लोखंडे या गावक-यांनीही आपले मनोगत मांडले. स्वयंसेवकांनी प्रातिनिधिक स्वरूपात या शिबीराच्या माध्यमातून आलेले अनुभव कथन केले. महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी प्रतिनिधी धम्मदीप ढोले याने शिबीराचे अहवाल वाचन केले, तर वैष्णवी राठोड हिने या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रशांत टाके यांनी आभार प्रदर्शन केले. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रम अधिकारी डॉ. हनुमंत जवळगे, डॉ. संजय काळे, सर्व स्वयंसेवक, महाविद्यालयातील सर्व शिक्षक व कर्मचारी आणि नारवटच्या गावक-यांनी परिश्रम घेतले.

# दुनगांवकरांनी भगवानगडाला दिली १ कोटी २३ लाख रुपयांची देणगी

### २६ कोटींचे शिवधनुष्य पेलविण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन

लोकनेता न्यूज नेटवर्क

भगवानगड (प्रतिनिधी)श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या २६ कोटी रुपये खर्च असणा-या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू झालेल्या आहेत. गडाच्या भक्तवर्गांपैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात.

श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ. श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे ( दुनगाव, ता.अंबड जि.जालना ) येथे आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले. त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले. जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण आकडेवारीची गोळाबेरीज ही १ कोटी २३ लाख रुपये झाली.

नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणा-या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत. एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे. या भव्य दिव्य मंदिरासाठी लागणारा खर्च अंदाजे २६ कोटी रूपये इतका आहे. त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.



## प्रताप देशमुख यांनी केला शिबिरात नवसंकल्प

परभणी/प्रतिनिधी संपूर्ण महानगरात भक्कम अशा पक्ष संघटनात्मक बांधणीसह आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीत जून्या आणि नवीन कार्यकर्त्यांच्या बळावर यश प्राप्तीचा संकल्प राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महानगर जिल्हाध्यक्ष तथा प्रथम महापौर प्रताप देशमुख यांनी शिर्डी येथील पक्षाच्या नव संकल्प शिबिरातून व्यक्त केला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने शिर्डीत दोन दिवशीय नव संकल्प शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबीरात शहरासह जिल्ह्यातील पदाधिकारी, आजी-माजी लोकप्रतिनिधी सहभागी झाले होते. या शिबीरात पक्षाचे महानगर जिल्हाध्यक्ष तथा प्रथम महापौर प्रताप देशमुख यांनी श्रेष्ठींसह वरिष्ठ नेतेमंडळींसमोर आपल्या भाषणातून काही संकल्प जाहीर केले. विशेषतः परभणी महानगरांतर्गत राष्ट्रवादीच्या संघटनात्मक बांधणीचा संकल्प सोडला. जून्या नेतेमंडळींसह कार्यकर्त्यांबरोबर काही नवीन पिढीतील सक्षम असे युवक व महिला कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश करीत आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीत मोठे यश पटकाविण्याचाही संकल्प व्यक्त केला. त्या दृष्टीने आपल्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते निश्चितच येत्या काळात प्रयत्नांची पराकाष्टा करतील, असे ते म्हणाले. दरम्यान, या शिबराचा शुभारंभ पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, राज्यसभा खासदार श्रीमती सुनेत्रा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. यावेळी पक्षाचे ज्येष्ठ नेते, मंत्रीमहोदय, आमदार, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# गावातील शेतरस्ते, शिवार रस्ते, पाणंद रस्ते खुले होणार

## आजपासून ३१ मार्चपर्यंत जिल्हा महसूल प्रशासनाचा कालबद्ध कार्यक्रम



बुलढाणोंज्ञानेश्वर बुधवत :- जिल्ह्यातील सर्व तालुक्यामधील सर्व गावामध्ये शेतरस्ते, शिवार रस्ते, पाणंद रस्ते कालबद्धरितीने खुले करण्यासाठी जिल्हा महसूल प्रशासनाने २० जानेवारी ते ३१ मार्च २०२५ पर्यंतचा कालबद्ध कार्यक्रम हाती घेतला आहे. त्यानुषंगाने कार्यपद्धती निश्चित करण्यात आली असून या कालबद्ध कार्यक्रमाचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी नुकतेच जारी केले आहे. या कालबद्ध कार्यक्रमानुसार... पहिल्या टप्प्यात दि २० ते २४ जानेवारीपर्यंत संबंधित गावच्या तलाठी यांनी उपअधिक्षक भूमी अभिलेख यांच्याकडुन ग्रामीण गाडी मार्ग (पोटखराब), पायमार्ग नमूद असलेले गाव नकाशे प्राप्त करुन घेणे. दुस-या टप्प्यात दि. २५ ते ३१ जानेवारी पर्यंत या नकाशातील ग्रामीण गाडी मार्ग (पोटखराब), पायमार्ग हे प्रत्यक्ष भेट देऊन त्यातील बंद असलेल्या रस्त्याची यादी तयार करणे. तिस-या टप्प्यात दि. १ ते ७ फेब्रुवारीपर्यंत बंद असलेले रस्ते ज्या भुमापन क्रमांकातून जातात त्यांचे भोगवटाधारकांची यादी तयार करणे. चौथ्या टप्प्यात दि. ८ ते १५ फेब्रुवारीपर्यंत भोगवटाधारक व गावातील सरपंच व इतर सहधारक यांची सदर रस्ता खुला करण्याबाबत बैठक आयोजित करुन समन्वयाने व सर्वसहमतीने रस्ता खुला करण्यासाठी प्रयत्न करणे, तसेच माम लेदार न्यायालय अधिनियम १९०६ चे कलम ५ व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४३ नुसार तहसिलदार यांच्याकडे दाखल असलेल्या प्रकरणात सर्व पक्षकार गावातील प्रतिष्ठीत व्यक्ती, सरपंच, ग्रामसेवक, तलाठी, मंडळ अधिकारी, कृषि सेवक यांच्या समवेत त्या त्या वादग्रस्त ठिकाणी स्थळ निरीक्षण करुन बैठक घेऊन संपवुन सर्व सहमतीने रस्ता खुला करण्यासाठी व दावा निकाली काढण्यासाठी लोकअदालतीच्या निकषानुसार प्रकरणात निर्णय घेणे. पाचव्या टप्प्यात दि. १६ ते २८ फ ेब्रुवारीपर्यंत चौथ्या टप्प्यातील प्रयत्नातून रस्ता खुला होत नसल्यास उपअधिक्षक भूमी अभिलेख यांच्या सहाय्याने रस्ता निश्चित करुन पोलिसांचे सहाय्याने तो खुला करणे. या कालबद्ध कार्यक्रम ाच्या अंतिम टप्यात दि. १ ते ३१ मार्चपर्यंत पाचव्या टप्प्यानुसार रस्ता खुला न झालेल्या प्रकरणांमध्ये मामलेदार न्यायालय अधिनियम १९०६ चे कलम ५ व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४३ नुसार अर्ज प्राप्त करुन घेऊन उचित नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. या कालबद्ध कार्यक्रमाच्या अनुषंगाने सर्व उपविभागीय अधिकारी (प्रांताधिकारी),सर्व तहसिलदार, गटविकास अधिकारी, उपअधीक्षक भूमी अभिलेख व पोलीस निरीक्षक यांनी समन्वयाने कामकाज करून ग्रामीण भागातील ग्रामीण गाडी मार्ग (पोटखराब) पायमार्ग कालबद्धरितीने खुले करावे, असे आदेश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिले आहेत.

## भिगवण मध्ये एकाच ठिकाणी तीन घरे फोडली.. आठ लाख रुपयांचा ऐवज गेला चोरीला!

लोकनेता न्यूज नेटवर्क

भिगवण :(बबनराव धायतोंडे)

:-थोरातनगर येथे बंद घराच्या गेटवरून चढून प्रवेश करत लोखंडी दार उचकटून सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेहल्याचा प्रकार इंदापूर तालुक्यातील भिगवण येथे घडला आहे. भिगवण पोलिस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावरच तीन ठिकाणी घरफोडीचे प्रकार घडले असून त्यामध्ये एकूण ८ लाख रुपयांचा ऐवज चोरीला गेला आहे. या घटनेनंतर भिगवण परिसरात खळबळ उडाली आहे.

याबाबत कृष्णा नारायण शेंडगे (रा. थोरातनगर,भिगवण ता.इंदापुर जि.पुणे यांनी भिगवण पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.याबाबत माहिती अशी की, दि. १६ व दि.१७ जानेवारी दरम्यान शेंडगे कुटुंबीय बाहेरगावी गेले होते.त्यामुळे त्यांचे घर बंद होते. दि.१७ जानेवारी रोजी पहाटे ३ वाजण्याच्या




सुमारास अज्ञात चोरटे बंद बंगल्याच्या गेटवरून चढून आतमध्ये आले.त्यांनी घराचे कुलूप तोडून सोन्याचे गंठण आणि रोख ४७ हजार रुपये असा एकूण ३ लाख ६९ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेहला.

याचदरम्यान,नीलम प्रकाश देवकाते (रा. थोरात नगर,भिगवण) यांच्याही बंद घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी सोन्याचे गंठण, चैन,कानातील रिंगा,चांदीचे जुडवे,आणि ६५ हजार रुपये रोख असा एकूण ३ लाख ८७ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेहला. याच परिसरात वास्तव्यास असलेल्या मच्छिंद्र रामगुडे यांचे भाडेकरू संपत हरिदास शेटे (मूळ रा.थेरवडी,ता.कर्जत, जि.अहिल्यानगर) यांची ८० हजार रुपये किमतीची बजाज पल्सर (क्र.एम.एच.१६ डी.एल.७२८६) चोरून नेहली आहे.

या प्रकरणी भिगवण पोलिसांनी घरफोडीसह विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक विनोद महांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अमित पाटील अधिक तपास करत आहेत. दरम्यान,भिगवण पोलिस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या भागात चोरट्यांनी एकाच वेळी तीन घरफोडीच्या घटना घडल्यामुळे खळबळ उडाली आहे.पोलिसांसमोर या घरफोडीतील आरोपींचा शोध घेण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

## आदिती तटकरे की भरत गोगावले? पालकमंत्रिपद कुणाकडे?



राज्याच्या राजकीय वर्तुळातून या क्षणाची मोठी बातमी समोर आली आहे. राज्य सरकारकडून अखेर पालकमंत्र्यांची यादी जाहीर करण्यात आली आहे. सत्ता स्थापनेनंतर गेल्या अनेक दिवसांपासून पालकमंत्रिपदासाठी जोरदार रस्सीखेच पाहायला मिळत होती. मात्र आता अखेर ही यादी जाहीर झाली आहे. रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदावरुन राष्ट्रवादी काँग्रेस विरुद्ध शिवसेना असा थेट सामना होता. राष्ट्रवादीच्या महिला बालकल्याण मंत्री आदिती तटकरे आणि शिवसेनेचे मंत्री भरतशेठ गोगावले यांच्यात थेट स्पर्धा होती. भरतशेठ यांनी अनेकदा पालकमंत्रिपदावर दावा ठोकला होता. मात्र अखेर आदिती तटकरे यांनी बाजी मारली आहे. आदिती तटकरे या रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री असणार आहेत.जवळपास २ महिन्यांनंतर यादीराज्यात महायुतीचं २३ नोव्हेंबर रोजी सरकार आलं. राज्यातील जनतेने महायुतीला एकहाती सत्ता मिळवून दिली. त्यानंतर राज्य सरकारच्या मंत्रिमंडळाचा ५ डिसेंबर रोजी नागपुरात शपथविधी पार पडला. मंत्र्यांनी पदभार स्वीकारला. मात्र कुणाला कोणत्या जिल्ह्याचं पालकमंत्रिपद द्यायचं? हे निश्चित होत नव्हतं. अखेर हा तिढा सुटलाय. आता १८ जानेवारीला पालकमंत्र्यांची यादी जाहीर झालीय.आदिती तटकरे यांनी रायफाडफ राखलाभरतशेठ गोगावले रायगडच्या पालकमंत्रिपदासाठी आग्रही होते. भरतशेठ गोगावले यांनी एकदा पालकमंत्रिपदावरुन बोलताना अजब वक्तव्य केलं होतं. ङ्गआदिती तटकरे यांनी पालकमंत्री म्हणून चांगलं काम केलं असलं तरी मी त्यांच्यापेक्षा मी चांगलं काम करून दाखवेन. शेवटी महिला आणि पुरुषात काही फरक आहे की नाही?ङ्ख असं अजब वक्तव्य गोगावले यांनी केलं होतं. यावरुन चांगलाच वादही रंगला होता.

# आदिवासी जनजाती समाजाचा आक्रोश मोर्चा



लोकनेता न्युज नेटवर्क माहूर योगेश चव्हाण आदिवासी बहिणीवर झालेल्या सामूहिक बलात्काराच्या,आत्याचाराच्या निषेधार्थ,



हु.गोंडराजे शंकरशाहा मंच ते उपविभागीय आधिकारी कार्यालय किनवट येथे भव्य



मोर्चा काढण्यात आला आदिवासी महिलांवर दिवसेंदिवस आत्याच्यार होत असल्याने आदिवासी समाजातील हजारो लोक या घटनेतील आरोपीविरुद्ध कठोर कारवाई व्हावी म्हणून सावित्रीबाई फुले चौक,छत्रपती शिवाजी महाराज चौक, राजमाता जिजामाता चौक, भगवान बिरसा मुंडा चौक येथे हजारो आदिवासी समुदाय शाळेतील मुले मुली आदिवासी महिला आणि आदिवासी लोकप्रतिनिधी या मोर्चात सहभागी झाले होते,यावेळी पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आले होते.कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## परभणीच्या पालकमंत्रीपदी मेघना साकोरे- बोर्डीकर

मुंबई : महाराष्ट्र राज्याचे मंत्री आणि राज्यमंत्री यांची जिल्हा पालकमंत्री तसेच सह पालकमंत्री म्हणून सामान्य प्रशासन विभागाने नियुक्ती केली आहे. यानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्रीपद असणार आहे तर ड.आशिष जयस्वाल यांच्याकडे सहपालकमंत्रीपद सोपविण्यात आले आहे. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मुंबई शहर आणि ठाणे या दोन जिल्ह्यांचे पालकमंत्रीपद तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पुणे आणि बीड या दोन जिल्ह्यांचे पालकमंत्रीपद देण्यात आले आहे. परभणीच्या पालकमंत्रीपदी मेघना साकोरे बोर्डीकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. खूप वर्षानंतर परभणी जिल्ह्याला पालकमंत्री लाभल्याने जिल्ह्यातील जनतेच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. उर्वरित जिल्ह्यांच्या पालकमंत्रीपदाची व सहपालकमंत्री पदाची जबाबदारी पुढीलप्रमाणे : नागपूर व अमरावती : चंद्रशेखर बावनकुळे, अहिल्यानगर : राधाकृष्ण विखे-पाटील, वाशीम : हसन मुश्रीफ, सांगली : चंद्रकांत पाटील, नाशिक : गिरीश महाजन, पालघर : गणेश नाईक, जळगाव : गुलाबराव पाटील, यवतमाळ : संजय राठोड, मुंबई उपनगर : ड.आशिष शेलार तर सहपालकमंत्री मंगलप्रभात लोढा, रत्नागिरी : उदय सामंत, धुळे : जयकुमार रावल, जालना : श्रीमती पंकजा मुंडे, नांदेड : अतुल सावे, चंद्रपूर : डॉ.अशोक उईके, सातारा : शंभूराज देसाई, रायगड : कु.आदिती तटकरे, लातूर : शिवेंद्रसिंह भोसले, नंदुरबार : ड.माणिकराव कोकाटे, सोलापूर : जयकुमार गोरे, हिंगोली : नरहरी झिरवाळ, भंडारा : संजय सावकारे, छत्रपती संभाजीनगर : संजय शिरसाट, धाराशिव : प्रताप सरनाईक, बुलढाणा : मकरंद जाधव (पाटील), सिंधुदुर्ग : नितेश राणे, अकोला : आकाश फुंडकर, गोंदिया : बाबासाहेब पाटील, कोल्हापूर : प्रकाश आबिटकर तर सहपालकमंत्री श्रीमती माधुरी मिसाळ, वर्धा : डॉ.पंकज भोयर आणि परभणी : श्रीमती मेघना बोर्डीकर

# गेवराईच्या स्वामी विवेकानंद ज्येष्ठ नागरिक संघास राज्यस्तरीय उत्कृष्ट संघ पुरस्कार

लोकनेता न्यूज नेटवर्क

गेवराई, (प्रतिनिधी ) - समाजामध्ये ज्येष्ठ नागरिकांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर आहे . असे एकही घर नाही की जेथे जेष्ठ नागरिक राहत नाही . अशा परिस्थितीमध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या अडी -अडचणी, समस्या, त्यांना विरंगुळा आणि त्यांच्या सुख -दुःखात सामील होणारी संघटना म्हणजे ज्येष्ठ नागरिक संघ आहे . या उद्देशाने गेवराई मध्ये स्थापन झालेल्या स्वामी विवेकानंद जेष्ठ नागरिक संघास राज्य संघटनेकडून शानदार कार्यक्रमात राज्यस्तरीय उत्कृष्ट संघ पुरस्कार देऊन नुकतेच गौरविण्यात आले . ज्येष्ठ नागरिक संघ लातूर द्वारा आयोजित महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक संघ (फेस्कॉम ) चे ३४ वे राज्यस्तरीय अधिवेशन ११ व १२ जानेवारी २०२५ रोजी लातूर येथील दिवाणजी मंगल कार्यालयात संपन्न झाले . या कार्यक्रमात दि. १२ जानेवारी रोजी राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचे औचित्य साधून महाराष्ट्र जेष्ठ नागरिक महासंघाच्या वतीने समारोप कार्यक्रमात महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील आणि महाराष्ट्र राज्य जेष्ठ नागरिक महासंघाचे अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये गेवराई येथील स्वामी विवेकानंद ज्येष्ठ नागरिक संघास उत्कृष्ट ज्येष्ठ नागरिक संघ म्हणून शाल ,श्रीफळ, सन्मानपत्र, सन्मान चिन्ह देऊन राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले . याप्रसंगी लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल




सागर, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, सहाय्यक आयुक्त शिवकांत चिकुर्ते यांची प्रमुख उपस्थिती होती . मंत्री महोदयांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारण्यासाठी ज्येष्ठ नागरिक संघाचे समन्वय समितीचे अध्यक्ष प्रा. राजेंद्र बरकसे, समन्वय समितीचे सदस्य एस.पी. सूर्यवंशी, स्वामी विवेकानंद जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष ईश्वर आबदरे व इतर पदाधिकारी सखाराम कानगुडे, रामकृष्ण चेडे ,अरुण परदेशी, लक्ष्मण रुकर, शोभाताई देशमुख, पुष्पाताई कोकाटे, यम ुनाताई म्हेत्रे यांनी उत्कृष्ट संघाचा पुरस्कार स्वीकारला . स्वामी विवेकानंद जेष्ठ नागरिक संघाने जेष्ठांची आरोग्य तपासणी, त्यांना म ानसिक शारीरिक आर्थिक मदत, वृक्षारोपण, विरंगुळा केंद्र निर्मिती, अडी - अडचणी सोडवणूक, जेष्ठांना कायदेविषयक मार्गदर्शन , वर्षा सहली, निसर्ग भ्रमण , वाचनालय, भजन - कीर्तन अशा विविध सुविधा, शासनाच्या सवलती उपलब्ध करून दिल्या आहेत . याशिवाय तालुक्यात अल्पावधित १२ संघ व ३०० सदस्य नोंदणी केली आहे . ज्येष्ठ नागरिक संघाचे राज्यस्तरीय अधिवेशन यशस्वी करण्यासाठी माजी अध्यक्ष अरुण रोडे, खा. डॉ. शिवाजीराव काळगे, चंद्रकांत महामुनी, प्रकाश घादगिने, डॉ. बी. आर. पाटील, दक्षिण मराठवाडा प्रांताचे विभागीय अध्यक्ष प्राचार्य डॉ. दामोदर थोरात, सचिव जगदीश जाजू , बीड जिल्हा जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष जगन्नाथ मामडगे यांनी विशेष परिश्रम घेतले. अतिशय शिस्तबद्ध आणि भरगच्च अशा कार्यक्रमात हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला . या कार्यक्रमास महाराष्ट्रातील ३५ जिल्ह्यातील ५००० ज्येष्ठ नागरिक महिला व पुरुष उपस्थित होते . स्वामी विवेकानंद जेष्ठ नागरिक संघास पुरस्कार मिळाल्या बद्दल श्रीराम आरगडे, अॅड. ड सुभाष निकम, प्रा. रामलिंग गुळवे, इंजि प्रकाश गिरी, एस. वाय. अन्सारी, बळीराम यादव ,वैजिनाथ मोरे, भीमजी पटेल, प्रभाकर घोडके, सुरेश मानधने ,डॉ अशोक येवले डॉ. भगवान जाधव, प्रमोद कुलकर्णी, बाबुराव नागरगोजे, प्रकाश भुते, विष्णु खेत्रे,प्रा . संदिपान हिंगे, सुभाष रणखांब , भास्कर ननवरे, दीपक पुरी, सतीश पल्लेवाड, नवनाथ बोडखे, नितीन कुलथे ,केशव पंडित, दत्तात्रय साळुंके, कल्याण हाकाळे, जयप्रकाश बाहेती ,विलास मडकर, राजेंद्र निकम, अमोल कापसे ,अॅड. राहूल रूचके आदींसह जेष्ठ नागरिकांनी व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी प्रत्यक्ष भेटून अभिनंदन केले .

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904